राज्यात नवीन प्राथमिक आरोग्य केंद्रांची स्थापना.......
सर्पणेत: नव्याने स्थापन करावयाची ५८ प्राथमिक आरोग्य केंद्रे.

महाराष्ट्र शासन,
सार्वजनिक आरोग्य विभाग,
निर्णय क्र. पीएचसी. १०९०/१४२/आरोग्य.४
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक:- २२ जानेवारी १९९०.

वाचा:- शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. आरएलएच. २४८६/१४४७/ आरोग्य.४, दिनांक १८.१.१९८९.

प्रास्ताविक:- केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूत्रानुसार "सर्वांसाठी आरोग्य" हे ध्येय इ.स. २००० पर्यंत साध्य करावयाचे आहे. तथापि महाराष्ट्र शासनाने हे ध्येय १९९१ पर्यंतच साध्य करावयाचे ठरविले आहे. त्यात अनुसरून आरोग्य सुविधा देणाऱ्या संस्था, खास करून प्राथमिक आरोग्य केंद्रे व ग्रामीण रुग्णालये १९९१ च्या अखेर आवश्यक त्या प्रमाणात स्थापन होणे जरूर आहे.

आतापर्यंत मंजूर करण्यात आलेली १५३१ प्राथमिक आरोग्य केंद्रे सर्वसाधारणपणे १९८१ ची जिल्हावार लोकसंख्या विचारात घेऊन स्थापन करण्यात आली आहेत. या प्राथमिक आरोग्य केंद्रांव्यतिरिक्त विशेष कृती कार्यक्रमाखाली गडचिरोली जिल्ह्यात ७ प्राथमिक आरोग्य केंद्रे व चंद्रपूर जिल्ह्यात १ फिरते आरोग्य पथक मंजूर करण्यात आले असून धुळे जिल्ह्यात १० फिरती आरोग्य पथके मंजूर करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

१९८१ च्या लोकसंख्येवर आधारीत आतापर्यंत जरी १५३१ प्राथमिक आरोग्य केंद्रे मंजूर करण्यात आलेली असली तरी या संस्थांच्या स्थलांतराबाबत तसेच अशा प्रकारच्या संस्था नव्याने मंजूर करण्याबाबत शासनाकडे लोकप्रतिनिधींच्या व इतर संस्थांच्या सतत आलेल्या मागण्या लक्षात घेऊन शासनाने जानेवारी १९८९ मध्ये मा. आरोग्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली एक मंत्रीमंडळ उप समिती स्थापन केली होती. या समितीने केलेल्या शिफारशी लक्षात घेऊन मंत्रीमंडळाने राज्यात १३१ नवीन प्राथमिक आरोग्य केंद्रे व १७ ग्रामीण रुग्णालये स्थापन करण्याचा व त्यास आवश्यक तो कर्मचारीवर्ग मंजूर करण्याचा निर्णय घेतलेला आहे.

निर्णय:-

मंत्रीमंडळाच्या वर उल्लेखिलेल्या निर्णयास अनुलक्षून राज्यात स्थापन करावयाच्या १३१ प्राथमिक आरोग्य केंद्रांपैकी सोबतच्या विवरणपत्र "अ" मध्ये दर्शविलेली ५८ प्राथमिक आरोग्य केंद्रे स्थापन करण्यास व त्या प्राथमिक आरोग्य केंद्रांना प्रत्येकी खाली दर्शविल्याप्रमाणे १३ जणांचा कर्मचारीवर्ग मंजूर करण्यास शासन संमती देत आहे.

| अ.क्र. | पदाचे नांव | पदसंख्या | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|
| १. | वैद्यकीय अधिकारी वर्ग. २ | २ | रु. २२००-७५-२८००-दरो-१००-४००० |
| २. | परिचारिका प्रसाविका | १ | रु. १४००-४०-१६००-५०-२३००-दरो-६०-२६०० |
| ३. | सहाय्यकारी परिचारिका प्रसाविका | १ | रु. १२००-३०-१४४०-दरो-३०-१८०० |
| ४. | आरोग्य सहाय्यक[पुरुष] | १ | रु. १२००-३०-१५६०-दरो-४०-२००० |
| ५, | मिश्रक | १ | रु. १३५०-३०-१४४०-४०-१८००-दरो-५०-२२०० |
| ६. | वाहनचालक | १ | रु. ९५०-२०-११५०-दरो-२५-१५०० |
| ७. | कनिष्ठ लिपीक | १ | रु. ९५०-२०-११५०-दरो-२५-१४०० |
| ८. | चतुर्थश्रेणी कर्मचारीवर्ग | ५ | रु. ७५०-१२-८७०-दरो-१४-९४० |
| | एकूण | १३ | |

वर उल्लेखिलेला कर्मचारीवर्ग हा त्या त्या प्राथमिक आरोग्य केंद्रात प्रथमतः २८ फेब्रुवारी १९९१ पर्यंत मंजूर करण्यात येत आहे. तथापि वर उल्लेखिलेल्या पदापैकी वाहनचालक हे पद संबंधित प्राथमिक आरोग्य केंद्राला वाहन मंजूर केल्याशिवाय भरण्यात येऊ नये. तसेच लातूर जिल्ह्यात मंजूर करण्यात आलेल्या "पोहेगांव" व बाळुळगांव" या दोन प्राथमिक आरोग्य केंद्रातील [१] वाहनचालक [२] लिपीक-नि-टंकलेखक व [३] ५ पैकी २ परिचरांची पदे त्या बाबतीत पुढील आदेश होईपर्यंत भरू नयेत.

या निर्णयानुसार मंजूर करण्यात आलेल्या वरील प्राथमिक आरोग्य केंद्रापैकी काही प्राथमिक आरोग्य केंद्रे ही आदिवासी भागात मोडतात. तर काही बिगर आदिवासी भागात मोडतात. आदिवासी विभागातील प्राथमिक आरोग्य केंद्रांचा खर्च हा "२२१०-वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य-०६-सार्वजनिक आरोग्य-०१०-किमान गरजा कार्यक्रम-पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-स्थानिक क्षेत्रातील योजना [राज्य योजना]-०१०[दोन] महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम, १९६१ च्या कलम १८७ अन्वये योजनेत्तर अनुदान [२२१० ०५५८]" या लेखाशिर्षाखाली खर्ची दाखविण्यात यावा. व शासन ज्ञापन, वित्त विभाग क्र. आकनि. ११९०/२०८/अर्थसंकल्प. ८, दिनांक ११ जानेवारी १९९० अन्वये मंजूर झालेल्या रु. ७,९५,०००/- आकस्मिकता निधीतून भागविण्यात यावा. आदिवासी विभागातील प्राथमिक आरोग्य केंद्रांवरील खर्च हा"टी-८". २२१०-वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य-०३-ग्रामीण आरोग्य सेवा-ॲलोपॅथी-१०३ प्राथमिक आरोग्य केंद्रे [दोन] महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियमाच्या कलम ८७ अन्वये जिल्हा परिषदांना अनुदाने व पंचायत समिती अधिनियम १९६१ अन्वये अर्थसहाय्य-[९] राज्य योजनांतर्गत योजना"या लेखाशिर्षाखाली खर्ची दाखविण्यात यावा व याबाबत लवकरच आदिवासी विकास विभागामार्फत मंजूर करण्यात येत

......../३-

असलेल्या आकस्मिकता निधीतील अग्रिमातून भागविण्यात यावा.

हा खर्च करताना वित्त विभाग परिपत्रक क्र. सीएनसएफ. १०८३/१८०/बीयुडी. ३, दिनांक २६.४.१९८३ व वित्त विभाग परिपत्रक क्र. सीएनएफ. १०८६/१५२/अर्थसंकल्प. ३, दिनांक २८.८.१९८६ अन्वये विहीत केलेल्या सूचनांची काटेकोर अंमलबजावणी करण्यात यावी. त्याचप्रमाणे वर नमूद केलेल्या दिनांक २८.८.१९८६ च्या परिपत्रकानुसार उपरोक्त अग्रिमाची रक्कम खर्च करताना सादर करावयाच्या देयकांवर पुढील प्रमाणपत्र लाल शाईने अधोरेखीत दाखविण्यात यावे:-

"आकस्मिकता निधी अग्रिम शासन ज्ञापन क्र. आकनि. ११९०/२०८/ अर्थसंकल्प. ८, दिनांक ११ जानेवारी १९९०"

[बिगर आदिवासी विभागातील प्राथमिक आरोग्य केंद्रांच्याबाबत] आदिवासी विभागातील प्राथमिक आरोग्य केंद्रांकरीता वेगळे आदेश काढण्यात येतील.

आकस्मिकता निधीतून सेतलेल्या अग्रिमांची परिपूर्ती करण्यासाठी एप्रिल १९९० ते मार्च १९९१ या कालावधीसाठी होणाऱ्या खर्चाची तरतूद करण्यासाठी पूरक मागणीचा प्रस्ताव संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांनी मार्च १९९० च्या अधिवेशनात सादर करण्याच्या दृष्टीने त्वरीत पाठवावा.

हा शासन निर्णय, नियोजन व वित्त विभाग यांच्या सहमतीने व वित्त विभाग अनौपचारिक संदर्भ क्र. सीआर. ३३/९०, व्यय. १२, दिनांक २२ जानेवारी १९९० अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[र. गो. बर्डे]
महाराष्ट्र शासनाचे सहाय्यक सचिव.

प्रति,

संचालक, आरोग्य सेवा, मुंबई.
अतिरिक्त संचालक[कुटुंबकल्याण मातावाल संगोपन व शालेय आरोग्य], पुणे.
सहसंचालक, आरोग्य सेवा[आरोग्य], पुणे.
सहसंचालक, आरोग्य सेवा[नियोजन], मुंबई.
उपसंचालक, आरोग्य सेवा, सर्व मंडळे.
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद[सोबतच्या विवरणपत्र"अ" मधील सूचीनुसार].
जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद[सोबतच्या विवरणपत्र"अ"मधील सूचीनुसार]
महालेखापाल [लेखा परीक्षा], महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
महालेखापाल [लेखा व अनुज्ञेयता], महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
नियोजन विभाग[योजना. १२], मंत्रालय, मुंबई.
वित्त विभाग, व्यय. १२/अर्थसंकल्प. ३/अर्थसंकल्प. ८, मंत्रालय, मुंबई.
ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
आदिवासी विकास विभाग [का. १४], मंत्रालय, मुंबई.
अर्थसंकल्प कार्यासन, सा. आ. विभाग.
सेवा. १/सेवा. २, सा. आ. विभाग.
आरोग्य. ४ [निवड नस्ती].

## विवरणपत्र –अ

शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. १०९०/१४२/आरोग्य.४, दिनांक २२ जानेवारी १९९० चे सहपत्र.

संपूर्णत: नव्याने स्थापन करावयाच्या ५८ प्राथमिक आरोग्य केंद्रांची यादी

| जिल्हा | तालुका | ठिकाण |
|---|---|---|
| ठाणे | वसई | चंदनसर |
| रायगड | म्हसाळा | मेंदादी |
| रत्नागिरी | संगमेश्वर | बुरंबी |
| | राजापूर | केळवली [निखरेवाडी] |
| सिंधुदुर्ग | देवगड | इळये |
| | कणकवली | नांदगांव |
| नाशिक | दिंडोरी | उंबराळे [आदिवासी] |
| | सुरगाणा | मानखेड [आदिवासी] |
| | पेठ | करंजाळी [आदिवासी] |
| धुळे | धुळे | कुसुंबा |
| जळगाव | चाळीसगाव | शिरसगाव |
| | एदलाबाद | उचंदे |
| | जळगाव | धानोरा |
| अहमदनगर | अकोला | लाडगाव [आदिवासी] |
| सातारा | सातारा | ठोसेघर |
| | पाटण | सोनवडे |
| सांगली | वाळवा | आष्टा |
| | इस्लामपूर | येलूर |
| | खानापूर | हिंगणगाव |
| | शिराळा | मांगले |
| सोलापूर | उत्तर सोलापूर | मार्डी |
| | माळशिरस | शंकरनगर |
| | माळशिरस | पुरंदावडे |
| | माळशिरस | फोंडशिरस |
| औरंगाबाद | पैठण | नांदर |
| | कन्नड | नाचनवेल |
| जालना | परतूर | सातोना |
| | भोकरदन | वालसावंगी |
| | जालना | बदनापूर |
| परभणी | कळमनुरी | रामेश्वरतांडा |
| | जिंतूर | कापडसिंगी |
| | गंगाखेड | धारासूर |
| | कळमनुरी | पिंपळदरी |
| बीड | माजलगाव | गंगामसला |
| | केज | नांदूरघाट |
| | पाटोदा | शिरूर |

........./२-

| जिल्हा | तालुका | ठिकाण |
|---|---|---|
| नांदेड | किनवट | राजगड [आदिवासी] |
| | नांदेड | विष्णूपुरी |
| | नांदेड | राहटी |
| | नांदेड | वाघाळा |
| उस्मानाबाद | उमरगाव | येणेगूर |
| | भूम | पारगाव |
| | उस्मानाबाद | जागजी |
| | उस्मानाबाद | पाडोळी [अक्कुवाई] |
| लातूर | लातूर | पोहेगांव |
| | लातूर | वाकुळगांव |
| बुलढाणा | खामगाव | गणेशपूर |
| अकोला | पातूर | मळसूर |
| | मंगळूरपीर | सेलूबाजार |
| अमरावती | धारणी | बिजुदावडी [आदिवासी] |
| | तिवसा | मार्डी |
| यवतमाळ | उमरखेड | कोरट [आदिवासी] |
| | बाभुळगाव | मातनी |
| | मोरगाव | मार्डी [आदिवासी] |
| | महागाव | महागाव |
| वर्धा | सेलू | सातेफळ |
| भंडारा | गोरेगाव | टिल्लीमोहगाव |
| | आमगाव | मोरार्जी |